**संक्षिप्त फौजदारी खटला क्र ५७१/२०१६**
**निशाणी क्र ४२**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र १
नावः जनार्धन धाया जोशी
वयः ६१ व्यवसायः व्यवसाय
रा. विंधणे. ता उरण

**<u>अभियोगपक्षातर्फे विद्वान वकील श्रीमती पोळ यांचेतर्फे साक्षीदाराचा सरतपास शपथेपर सुरू</u>**

सन २०१६ मध्ये मी उरण तालुका कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष म्हणून कार्यरत होतो. दिनांक २३/०६/२०१६ रोजी पंडीत घरत यांनी वादळवारा या वृत्तपत्रात बातमी दिली होती की शिवसेनेचे आमदार मनोहर भोईर यांना कॉंग्रेस कडून क्लिन चिट या मथळ्याची बातमी दिली होती. पंडीत घरत हे उरण तालुका कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष होते. सदरची बातमी मी वाचल्यानंतर आमचे कमीटीचे प्रमुख सभासद यांचेशी मी चर्चा केली व अशा पध्दतीची बातमी वृत्तपत्रात देणे चुकीचे आहे असे त्यांना सांगितले असता आमचे कमिटीमध्ये असे ठरले होते की पंडीत घरत यांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात यावी. त्यानंतर दिनांक २७/०६/२०१६ रोजी त्याअनुषंगाने आम्ही सदरची कारणे दाखवा नोटीस पंडीत घरत यांना बजावली. दिनांक ०१/०७/२०१६ रोजी पंडीत घरत यांनी सदर कारणे दाखवा नोटीसीला उत्तर दिले. सदरचे नोटीसीचे उत्तर आमचे कमिटीसमोर ठेवण्यात आले व त्याचेवर चर्चा करून दिनांक ०२/०७/२०१६ रोजी कमिटीने पंडीत घरत यांना उपाध्यक्ष या पादावरून कमी केले व त्या आशयाचे पत्र पंडीत घरत यांना देण्यात आले. दिनांक १५/०७/२०१६ रोजी उरण नगरपरीषदेचे निवडणूकीसंदर्भात कॉंग्रेस कमीटी मेंबर उरण तालुका कॉंग्रेस कमिटीचे कार्यालयात जमलो होतो त्यावेळी माझेबरोबर मिलींद पाडगावकर, बबन कांबळे, शैलेश तामगाडगे, यशवंत म्हात्रे व इतर १० ते १५ लोक चर्चा करण्यासाठी जमलो होतो. आम्ही चर्चा करीत असताना पंडीत घरत, एकनाथ घरत, किसन घरत, मुकेश घरत, रूपेश घरत, आमचे पक्षाचे कार्यालयात घुसले व त्यांचेबरोर इतर १० ते १५ लोक आले होते त्यांचे हातामध्ये काठ्या होत्या. त्यानंतर पंडीत घरत व किसन घरत यांनी मला माझे शर्टचे कॉलरला पकडून माझे चेअरवरून टेबलवर फरफटत ओढून खाली पाडले तेव्हा बाजूच्या लोकांनी लाथाबुक्यांनी माझे पाठीवर, तोंडावर, संपूर्ण शरीरावर मारहान केली व माझे अंगातील टी शर्ट फाडले. त्यावेळी बबन कांबळे व शैलेश तामगाडगे मला वाचवण्यासाठी माझे अंगावर पडले. सदर घ टनेच्या वेळी मुकेश, रतेश यांनी मला धमकी दिली की यापुढे असा कोणता प्रकार केलात तर मला ते ठार करतील. सदरचे घटनेचे वेळी आरोपींनी यशवंत

म्हात्रे यांनादेखील त्यांचे खुर्चीवरून ओढले व त्यांनादेखील लाथाबुक्यानी मारहान केली होती तसेच यशवंत म्हात्रे यांचे डोळ्याला दुखापत झाली होती. त्यानंतर आरोपी हे घटनास्थळावरून पळून गेले. सदरचे घटनेत माझे हातातील एक अंगठी गहाळ झालेचे माझे लक्षात आले. त्यानंतर आमचे पक्षाचे कमिटी मेंबर्स व मी उरण पोलिस ठाणे येथे गेलो व आरोपीविरूध्द सदर घ टनेबाबत तक्रार नोंदवली आता मला सदरची तक्रार दाखण्यात आली ती तीच असून त्याचेवर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क** <u>४३/क</u> देण्यात येते. मी दिनांक २७/०६/२०१६ रोजी पंडीत घ रत यांना आमचे कॉग्रेस कमिटीचे कार्यालयामार्फत नोटीस दिली होती सदर नोटीसीची छायांकित प्रत आता मला दाखवण्यात आली ती तीच आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते. या घटनेबाबत उरण कॉगेस कमिटीचे मार्फत दिनांक १८/०७/२०१६ रोजी एक ठराव पारीत करण्यात आला होता त्याची छायांकित प्रत आता मला दाखवण्यात आली त्यास **आर्टीकल ब** देण्यात येते. दिनांक २४/०७/२०१६ रोजी मी महाराष्ट्र कमिटी यांना सदर घटनेबाबत पत्रव्यवहार करून आरोपींविरूध्द तक्रार केली होती. सदर पत्राची छायांकित प्रत आता मला दाखवण्यात आली त्यास **आर्टीकल क** देण्यात येते. मी रायगड जिल्ह्याचे कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष आर सी घरत यांना पत्र दिले होते आता मला सदर पत्राची छायांकित प्रत दाखवण्यात आली त्यास **आर्टीकल ड** देण्यात येते. दिनांक ०१/०७/२०१६ रोजी आरोपी पंडीत घरत यांना उपाध्यक्ष पदावरून कमी करण्याचे पत्र कमिटीमार्फत देण्यात आले होते त्या पत्राची छायांकित प्रत आता मला दाखवण्यात आली त्यास **आर्टीकल इ** देण्यात येते. दिनांक ०१/०८/२०१६ रोजी आरोपी एकनाथ घरत,भारत भोईर, किसन घरत, मुकेश म्हात्रे, रूपेश घरत यांना कॉगेस पक्षातून काढून टाकण्याबाबतची पत्रे कमिटीमार्फत देण्यात आली होती त्या पत्रांची छायांकित प्रती आता मला दाखवण्यात आली त्यास एकत्रितपणे **आर्टीकल ई** देण्यात येते. आता मला उरण कॉगेस कमिटीची प्रोसीडींग बुकची छायांकित प्रत दाखवण्यात आली त्यास **आर्टीकल उ** देण्यात येते. आरोपी आजरोजी कोर्टात हजर आहेत.

सरतपास पूर्ण

**<u>सर्व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री योगेश गांगण यांचेतर्फे साक्षीदाराचा उलटतपास सुरू</u>**

सदरची घटना झाल्यानंतर मी संध्याकाळी आठ—सव्वा आठचे दरम्यान उरण पोलिस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी पोचलो होतो. माझी तक्रार मी उरण पोलिस ठाणे येथे पोचल्यानंतर साधारण आर्ध्या तासाने नोंदवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की माझी तक्रार लिहून घेतल्यानंतर साधारण पावणेनउ चे दरम्यान मी सदरचे तक्रारीवर सही केली. पावणेनउ चे दरम्यान पंडीत घरत यांनी माझे विरूध्द उरण पोलिस ठाणे येथे एनसी दाखल केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. सदरचे एनसी मध्ये पंडीत घरत यांनी मी व यशवंत म्हात्रे

असे आम्ही दोघे कंपन्याकडून ४० ते ५० लाख रूपये उरण तालुक्यातील कॉग्रेस पक्षाचे नावाखाली घेत असतो असे नमूद केले आहे किंवा कसे हे मला माहीत नाही.

त्यादिवशी साडेदहा ते अकरा वाजेपर्यंत उरण पोलिस स्टेशन येथे होतो. मला वैद्यकिय तपासणीसाठी पोलिसांमार्फत पाठवण्यात आले होते. पोलिसांनी मला वैद्यकिय तपासणीसाठी माझेकडे व्यक्तीशः पत्र दिले नव्हते. मी साधारण साडेनउ चे सुमारास इंदिरा गांधी हॉस्पीटल येथे वैद्यकिय तापासणीसाठी पोचलो होतो. माझी वैद्यकिय तपासणी साधारण पंधरा ते विस मिनीटात करण्यात आली त्यानंतर मी पोलिस स्टेशनला पोलिसांनी मला बोलावले असल्याने गेलो होतो. मी साधारण १० चे सुमारास पोलिस स्टेशनला आलो. मी वैद्यकिय तपासणी करूण आल्यानंतर माझा लेखी जबाब पोलिसांनी घेतला नव्हता. यशवंत म्हात्रे हे पोलिस स्टेशनला असल्यामुळे मी देखील त्यांचेबरोबर साधारण सव्वा अकरा पर्यंत पोलिस स्टेशनला थांबलो होतो.

हे म्हणणे खरे आहे की मी दिलेली फिर्याद ही मी त्यादिवशी वाचली होती व वाचून त्याचेवर सही केली होती. माझे सांगण्याप्रमाणे सदरची फिर्याद लिहून घेतलेली होती. मी माझे फिर्याद देताना घटनेच्या वेळी आरोंपीबरोबर इतर दहा ते पंधरा लोक आले होते व त्यांचे हातामध्ये काठ्या होत्या व ते लोक कार्यालयाचे बाहेर थांबले होते असा मजकुर पोलिसांना सांगितलेला होता. पंडीत घरत याने मला घटनेच्या वेळी माझे टि शर्टचे कॉलरलाधरून खुर्चितून टेबलवर फरफटत खाली पाडले हा मजकुर मी पोलिसांना सांगितलेला होता. आता मला माझी फिर्याद दाखवण्यात आली त्याचेमध्ये आरोपीबरोबर इतर १० ते १५ लोक कार्यालयाचे बाहेर उभे होते हे मी पोलिसांना सांगितले होते तो पोलिसांनी का नमूद केला नाही याचे कारण मी आजरोजी सांगू शकत नाही. आता मला माझा पोलिस जबाब दाखवला असता त्याचेमध्ये खुर्चितून ओढून टेबलवरून फरफटत खाली पाडले असा मजकुर मी पोलिसांना सांगितला होता परंतु त्यांनी तो का नमुद केला नाही याचे कारण आजरोजी मला सांगता येत नाही. बाजूचे उभ्या असलेल्या लोकांनी मला मारहान केली हा मजकुर मी माझे पोलिस जबाबामध्ये सांगितला होता तो पोलिसांनी का नमूद केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. बबन कांबळे व शैलेश तामगाडगे हे मला वाचवण्यासाठी माझे अंगावर पडले होते असा मजकुर मी माझे पोलिस जबाबामध्ये सांगितला होता तो पोलिसांनी का नमूद केला नाही त्याचे कारण मी आजरोजी सांगू शकत नाही. यशवंत म्हात्रे यांना खुर्चितून खेचून खाली पाडले बाबतचा मजकुर मी पोलिसांना जबाब देताना सांगितला होता पण त्यांनी तो का नमूद केला नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. सदर घटनेमध्ये यशवंत म्हात्रे यांचे डोळ्याला दुखापत झाली असा मजकुर मी माझा जबाब देताना पोलिसांना सांगीतला होता पण पोलिसांनी तो का नमूद केला नाही त्याचे कारण

मी आजरोजी सांगू शकत नाही. सदर घटनेमध्ये माझे टि शर्ट फाटल्याबाबतचा मजकुर मी पोलिसांना सांगितला होता तो माझे पोलिस जबाबामध्ये का नमूद नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही. सदरचा टि शर्ट हा मी त्याचदिवशी पोलिसांना दिला होता. पोलिसांनी मी टि शर्ट दिल्यानंतर त्याचा रीतसर पंचनामा केला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. ज्यांनी माझा पोलिस जबाब घ ेतला त्यांचेकडे मी माझा टि शर्ट दिलेला नव्हता. मी एपीआय पाटील यांना ओळखतो परंतु त्यांचेकडे मी माझा टि शर्ट दिला होता किंवा कसे हे मला आठवत नाही.

कोर्टात या आधी मी एक ते दोन वेळा साक्षीदार म्हणून आलो होतो. माझेवरती गुन्हे दाखल होते साक्षीदार स्वत:हून सांगतो की सदरचे सर्व गुन्हे हे राजकीय काम करीत असताना झाली होती. हे म्हणणे खरे आहे की जागेच्या संदर्भात एका सरदारजी ने माझे विरूध्द न्यायालयामध्ये फसवणूकीचा गुन्हा दाखल केला होता. त्याचे नाव मला आजरोजी सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की आमचे कार्यालयाला लागूनच नाक्यावर रिक्षा स्टॅंड आहे. हे म्हणणे खरे आहे की आमचे कार्यालयाला लागूनच सर्व रिक्षा रांगेत उभ्या असतात. हे म्हणणे खरे नाही की संध्याकाळी सातचे नंतर आमचे कार्यालयाचे बाजूला रिक्षांची वर्दळ असते. आमचे कार्यालयाला लागून पत्रकार संघाचे ऑफिस आहे व आमचे कार्यालयास लागून पंधरा फुटी देवुळवाडीला जाणारा मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की संध्याकाळचे वेळात आमचे कार्यालयाचे रस्त्यावर वर्दळ असते. सदरची घटना घडत असताना लोकांची वर्दळ कार्यालयात झाली होती असे घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलिस स्टेशन हे आमचे कार्यालयापासून वाहनाने तिन मिनीटे व चालत ४ ते ५ मिनीटाचे अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर घटनेबाबत मी पोलिस स्टेशनला रात्री साडेदहाचे आधी तोंडी तक्रार दिलेली नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की घटनेमध्ये मला झालेली मारहान याबाबतचे वैद्य कीय दाखले व्यक्तीश: माझेकडे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की त्यादिवशी आमचे कमिटीचे इतर मेंबर देखील पोलिस स्टेशनला हजर होते. मी पोलिस स्टेशनला हजर असताना माझेसमोर इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जाबजबाब पोलिसांनी नोंदवले किंवा कसे हे मला आजरोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मिलींद पाडगावकर, यशवंत पाटील, महेंद्र कांबळे, प्रकाश पाटील, शैलेश तामगाडगे, मंगलदास कांबळे, प्रविण पाटील, सुरेश शेलार, यांनी घ टनेच्या दिवशी पोलिसांना घटनेबाबत माहीती दिली नाही. पोलिसांनी या लोकांची माहीती केव्हा नोंदवली हे आजरोजी मला सांगता येणार नाही.

मी दिनांक ०१/०७/२०१६ रोजी पंडीत घरत यांनी दिलेल्या बातमी संदर्भात कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. पंडीत घरत यांनी माझेविरूध्द जिल्हाध्यक्ष

आर.सी घरत यांचेकडे तक्रारी अर्ज केला होता किंवा कसे याबाबत मला माहीती नाही. दिनांक १६/११/२०१५ रोजी पंडीत घरत यांनी आर.सि. घ ारत यांचेकडे माझेविरूध्द मी कंपन्याकडून पैसे घेतो याबाबत ची तक्रार केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की त्या चौकशी अर्जाचे अनुषंगाने आरसी घरत यांनी माझे विरूध्द चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की या पंडीत घरत यांनी केल्याल्या तक्रारी अर्जामुळे व दिनांक १५/०७/२०१६ राजी माझेविरूध्द दाखल केलेल्या केलेल्या एनसी क्र ८३१ याचा राग धरून मी आरोपीविरूध्द खोटी तक्रार केली आहे. मला पोलिसांनी मी तक्रार दिल्यानंतर चौकशी कामी बोलावले नव्हते. पोलिस आमचे कार्यालयात चौकशीकामी आले होते. घटनेच्या दुस—या दिवशी पोलिस साडेअकराचे दरम्यान आमचे कार्यालयात आले होते. त्यावेळी मिलींद पाडगावकर, बबन कांबळे, प्रकाश पाटील, शैलेश तामगाडगे व इतर ४ ते ५ कार्यकर्ते होते. सदरचे सर्वजण अकरा ते साडेअकराचे सुमारास हजर होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी मला मारहान केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला झालेल्या मारहाणीबाबत मी इंदिरा गांधी हॉस्पीटल येथे उपचार घेतले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचा सदर गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी फिर्याद दिली.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही.

उरण
दिनांक ३०/११/२०२१

श्रवणस्विकृती

आर.बी.पोळ
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग उरण